सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्र विभाग येथून प्रकाशित.

वृत्तविद्या



• पुणे, बुधवार, २४ ऑक्टोबर २०१८. आवृत्ती : १ अंक : २

अग्रलेख : सामाजिक भानाचे दहन?

दसहजारी मनसबदार!

जगातील सर्वाधिक लांबीचा सागरी पूल चीनमध्ये

बीजिंग, ता. २४ : चीनमधील शहर झुहाईला हाँगकाँग आणि मकाऊ यांच्याशी जोडणारा जगातील सर्वाधिक लांबीचा पूल आज वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. सुमारे दीड लाख कोटी खर्चून उभारल्या गेलेल्या या पुलाचे काम २००९ पासून सुरू होते. हा पूल हाँगकाँगला चीनच्या दक्षिणेकडील झुहाई शहराशी आणि मकाऊच्या गॅमलिंग एनक्लेव्हशी जोडला गेला आहे. विशेष म्हणजे या पूलासाठी आयफेल टॉवरच्या ६० पट लोखंड वापरले गेले आहे.

ऑनलाइन फटाकेविक्रीवर बंदी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

नवी दिल्ली, ता.२४ : देशभरातील दिवाळीच्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने फटाक्यांच्या बाबतीत नुकताच महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. दिवाळीत होणाऱ्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी देशभरात फटाक्यांच्या विक्रीवर बंदी आणावी अशी मागणी सर्वोच्च न्यायालयाकडे करण्यात आली होती.परंतु ही मागणी फेटाळून लावत न्यायालयाने फटाके विक्रीला परवानगी दिली आहे.

फटाक्यांच्या ऑनलाइन विक्रीवर मात्र बंदी घालण्यात आली आहे.तशी सक्त ताकीद सर्व ई कॉमर्स कंपन्यांना न्यायालयाकडून मिळाली आहे. दिवाळीत रात्री ८ ते १० या वेळेतच फटाके वाजवण्याचे बंधन नागरिकांवर राहणार आहे.परवाना असलेले विक्रेतेच फटाक्यांची विक्री करू शकतात,तसेच ज्यामुळे कमी प्रदूषण होते असे ग्रीन फटाके वाजवण्याची परवानगी आहे असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

मंत्रिमंडळात राहण्याची इराणींची योग्यता नाही : वंदना चव्हाण

प्रणित जाधव

पुणे, ता. २४ : "मागील दीड-दोन महिन्यांपासून चालू असलेली मीटू मोहीम, शबरीमला मंदिरात महिलांना जाऊ देण्याचा उच्च न्यायालयाचा निर्णय आणि एकूणच सुरू असलेले महिला सक्षमीकरणाचे प्रयत्न पाहता इराणींचे वक्तव्य हे खेदजनकच आहे. एक महिला म्हणून त्यांचे असे विचार असतील तर त्या मंत्रिपदावर बसण्यासाठी पात्र नसून त्यांनी या कृतीबद्दल राजीनामा द्यावा," अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार वंदना चव्हाण यांनी केली. शबरीमला मंदिरात महिलांना मिळत नसलेल्या प्रवेशावरून चालू असलेल्या वादंगात स्मृती इराणींनी उडी घेत 'रक्ताने भिजलेले सॅनिटरी नॅपकिन घेऊन देवाच्या घरी, म्हणजे मंदिरात जाणे योग्य वाटते का' असा सवाल मंगळवारी केला. त्यांच्या या वक्तव्यानंतर सर्वच स्तरांतून त्यांच्यावर टीका केली जात आहे. त्यांच्या वक्तव्याचा निषेध म्हणून आज राष्ट्रवादी काँग्रेसने पुण्याची ग्रामदैवत असलेल्या तांबडी जोगेश्वरी मंदिरासमोर आज निषेध केला. यावेळी त्यांनी 'या सरकारचं करायचं काय? खाली डोके वर पाय' अशी घोषणाबाजी केली. निदर्शनात खासदार ऍड. वंदना चव्हाण, रविंद्र माळवदकर, डॉ. सुनिता मोरे आणि पक्षाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

अप्पा बळवंत चौक : स्मृती इराणींनी केलेल्या वक्तव्याचा निषेध करताना पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

विख्यात झाला, पण उद्योजक म्हणून...

अंकुश फोपसे

पुणे, ता. २४ : "मराठी उद्योजकता वाढीस न लागण्यामागे आर्थिक कारणे आहेत. आपली स्वप्नं आपण मुलांवर लादतो. आम्हाला काहीतरी वेगळं करायचं आहे, अशा मानसिकतेमधून मुलांच्या हातून वेगळे काहीतरी घडू शकते," हे मत डॉ.अच्युत गोडबोले यांनी व्यक्त केले.

प्रसिद्ध उद्योजक प्रकाश रत्नपारखी यांच्या उद्योग कर्तृत्वाचा परिचय करून देणाऱ्या 'स्वयंप्रकाश' या गौरव ग्रंथाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. प्रकाशन समारंभाला रत्नपारखी यांचे अनेक मित्र उपस्थित होते. यावेळी त्यांचे मित्र एअर मार्शल भूषण गोखले यांनी त्यांच्या मैत्रीच्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, आम्ही दोघे चाळीस वर्षे पासून दूर असलो तरी आमचे घनिष्ठ संबंध आहेत. हृदयाने जे एकत्र येतात तेच प्रकाशित होतात. कितीही उंच उडाले तरी पाय जमिनीवर राहिले पाहिजेत, हे प्रकाशकडे बघून कळते.

प्रा.मिलिंद जोशी म्हणाले, मराठी समाजात उद्योजकता वाढीस लागली नाही कारण मळलेल्या वाटा स्वीकारणे आणि धोका पत्करून व्यवसायात उडी न घेणे ही मराठी समाजाची कमजोरी आहे. मराठी समाजात प्रत्येक माणूस वेगवेगळ्या कलेने घडलेला आहे. आपल्याकडे मराठी माणसाची मानसिकता गरीब आहे. तरी आपण उद्योजक घडवू शकलो नाही तरी उद्योग क्षेत्राला मनुष्यबळ निर्माण करून देऊ शकतो. मराठी भाषा ही साहित्यिकांनीच नव्हे तर उद्योजकांनी देखील मोठी केली आहे. त्यामुळे हे पुस्तक अभ्यासक्रमाला लावले पाहिजे, असेही ते म्हणाले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ दिग्दर्शिका सई परांजपे, मसापचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी, सदानंद महाजन उपस्थित होते.

> "आकाशवाणीवर सकाळी १० वाजता मी आणि नाना (गोपीनाथ तळवलकर) 'बालोद्यान'चा कार्यक्रम करत असायचो. सकाळी मुले दाटीवाटीने बसलेली असायची. त्यात टपोऱ्या डोळ्यांचा, चुणचुणीत प्रकाश बोलायचा.... भावपूर्ण चेहरा, लाघवी वृत्तीमुळे हा पुढे चालून विख्यात कलाकार होईल, असे वाटले.... तो विख्यात झाला खरा पण कलाकार म्हणून नाही तर उद्योजक म्हणून....
> – सई परांजपे

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे तीनतेरा...

चेतन झडपे

पुणे, ता. २४ : जवळपास पंच्याहत्तर झोपड्यांच्या जमिनी योजनेअंतर्गत मिळवून तब्बल वर्षभरापेक्षा जास्त कालावधी उलटूनही विकसकाने प्रकल्पाला सुरूवात केलेली नाही. या प्रकल्पाच्या भूमीपूजनाला विकसकाकडून मुहूर्त मिळत नसल्याने यंदाचीही दिवाळी आपल्या हक्काच्या घरात साजरी करता येणार नाही, अशी खंत प्रकल्पग्रस्तांनी व्यक्त केली.

पांडवनगर पोलीस चौकीजवळील झोपडपट्टीत ओम साई कन्स्ट्रक्शनने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे कंत्राट वर्षभरापूर्वी घेतले आहे. या संबंधित झोपड्यांच्या जमीन अधिग्रहण झाले आहे. जवळपास पंच्याहत्तर घरांचे प्रकल्प नियोजित आहे. विकसकाने प्रकल्पासाठी जमीन ताब्यात घेण्याव्यतिरिक्त कोणतेही काम केलेले आढळून आले नाही.

या संबंधी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे अधिकारी पांडुरंग पोले यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधला असता ते म्हणाले की, या योजनेचा कालावधी साधारण वर्षभराचा होता, जास्तीत जास्त तीन महिने अधिकच्या कालावधीची वाढ ग्राह्य धरली तरी, आतापर्यंत सदर प्रकल्पाचे काम कमीत कमी ऐंशी टक्के पार पडणे आवश्यक होते. या प्रकल्पात विकसकाने दिरंगाई केली आहे.

प्रकल्पग्रस्तांना राहण्याची पर्यायी व्यवस्था म्हणून तीन हजार रूपये घरभाडे देण्यात येते. गेले वर्षभर पंच्याहत्तर कुटुंब भाडेतत्त्वावर जवळच्या परिसरात राहत आहेत. प्रकल्पग्रस्तांशी संवाद साधला असता तीन हजार रूपये भाडेतत्त्वावर राहण्यासाठी तुटपुंजे असल्याचे सांगून घरभाडे किमान पाच हजार रूपये मिळावे अशी मागणी त्यांनी केली. प्रकल्पबाधिक विजय गोसावी यांच्याशी बोलले असता ते म्हणाले, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या नियमानुसार प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहण करण्यापूर्वी प्रत्येक झोपडीधारकास संमतीपत्र देणे आवश्यक असते परंतु अद्याप कोणालाही संमतीपत्र मिळालेले नाही. याबद्दल या योजनेचे कंत्राट हाती घेतलेल्या ओम साई कन्स्ट्रक्शनच्या दिलीप मुंदडा यांना विचारले असता ते म्हणाले की, जमीन अधिग्रहण प्रक्रियेमध्ये अनेक अडचणी आल्या आहेत. प्रशासनाने या प्रकल्पाच्या मंजुरीबाबत टाळाटाळ केली आहे.

सीबीआय संचालकांची सुप्रीम कोर्टात धाव

नवी दिल्ली, ता. २४ : सीबीआयचे संचालक आलोक वर्मा आणि विशेष संचालक राकेश अस्थाना यांच्यात भ्रष्टाचारावरून आरोप प्रत्यारोप झाल्याने केंद्र सरकारने या दोन्ही संचालकांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाविरुद्ध आलोक वर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. आपल्याला पदावरून दूर करताना सर्व नियम आणि कायदे केंद्र सरकारने धाब्यावर बसवले आहेत असा आरोप वर्मा यांनी केला आहे. यावेळी ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण म्हणाले, 'वर्मा यांना पदावरून दूर करणं चुकीचं असून बेकायदेशीर आहे, कारण वर्मा यांचा कार्यकाळ निश्चित करण्यात आलेला आहे. शिस्तभंगाच्या आरोपावरून त्यांना हटवायचे असल्यास तो अधिकार फक्त निवड समितीचाच आहे. याप्रकरणात कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ नये याची खबरदारी समितीनेच घेणं अपेक्षित होतं.' राफेल प्रकरणाची सीबीआयने चौकशी करू नये म्हणूनच सीबीआयला लक्ष्य केले जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

दरम्यान, वर्मा आणि अस्थाना यांच्यातील वितुष्ट जुनेच असल्याचे यामुळे समोर आले आहे. अस्थाना यांना विशेष संचालकपदी बढती देण्यास वर्मा यांचा विरोध होता असे समजते.

का होतायत वाघ नरभक्षक ?

तेजसी आगाशे

यवतमाळ, ता. २४ : जिल्ह्यातील पांढरकवडा शहराच्या परिसरात सध्या भीतीचे वातावरण आहे. त्याचे कारण आहे 'अवनी', म्हणजेच टी -१ नावाची वाघीण. जंगलाच्या शोधात अवनी सुमारे पन्नास किलोमीटर प्रवास करून टिपेश्वर वन्यजीव अभयारण्यातून पांढरकवडा येथे आली. तिच्याबरोबर तिचे दहा महिन्यांचे दोन बछडे आहेत. जानेवारी २०१६ मध्ये अवनीने पहिला मनुष्यबळी घेतला आणि एका नवीनच संकटाचा सिलसिला सुरु झाला. ऑगस्ट २०१८ मध्ये तिने १३ बळी घेतले आहेत. त्यानंतर तिला जेरबंद करण्याचे प्रयत्न सुरु झाले, वनविभागाने जागरूकतेसाठी वेगवेगळ्या योजना राबवायला सुरुवात केली.

यानंतर वनसंरक्षक आणि वन्यप्रेमी या दोन गटांमध्ये जणू एक संघर्षच सुरु झाला. ऑगस्टमध्ये एकापाठोपाठ एक अशा ३ माणसांना अवनीने ठार केल्यावर प्रमुख वनसंरक्षकांनी 'या वाघिणीस बेशुद्ध करा किंवा ठार करा' असा आदेश दिला . त्याला लगेच वन्यप्रेमींनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. न्यायालयाकडून वनविभागाच्या आदेशाला हिरवा कंदिल मिळाल्यावर वन्यप्रेमींनी समाजमाध्यमांचा आसरा घेत 'अवनीला वाचवा' मोहीम सुरु केली.

पण या सगळ्यात मूळ मुद्दा बाजूलाच राहिला आहे. का होत असतील वाघ नरभक्षक? त्यांना त्यांचा अधिवास सोडून इतरत्र जायची वेळ का आली असेल? मुळात त्यांना अधिवास उपलब्ध तरी राहिले आहेत का? त्यांच्या टापूत मानवी हस्तक्षेप वाढल्यामुळे त्यांना नवीन जागा शोधण्याची गरज निर्माण झाली आहे. वाघ हा परिसंस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मुळात मानव प्राणी हे वाघाचे मूळ अन्न नाहीच. पण मानवी आक्रमणांमुळे वाघाचे हक्काचे अधिवास नष्ट होऊन वाघ सैरभैर झाले आहेत. इतर प्राण्यांपेक्षा मानवाची शिकार करणे खूपच सोपे आहे, आणि शेवटचा पर्याय म्हणून मानवाला वाघ भक्ष्य बनवतात. हा सोपा मार्ग लक्षात आल्यावर त्यांना मानवी रक्ताची चटक लागते, आणि परिणामी वाघ नरभक्षक बनतात. तसेच सोबत बछडे असलेली वाघीण अतिशय आक्रमक आणि पिल्लांचे रक्षण करण्यासाठी तत्पर असते.

अवनी

हे सर्व घटक फक्त वाघ वाचवण्यापेक्षा त्यांच्या अधिवासाचे जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे, ही बाब अधोरेखित करतात. सध्या देशात आणि विदेशातही 'लेट अवनी लिव्ह' या मोहिमेने जोर धरला आहे. वाघ वाचवा, प्रोजेक्ट टायगर अशा मोहिमा आणि वाघांच्या रक्षणाबाबत निर्माण झालेली जागरूकता कौतुकास्पद आहेच, पण समस्येच्या मुळाशी जाऊन शोध घेतला नाही तर हे प्रयत्नही निष्फळच ठरतील. वाघ नरभक्षक झाला असेल तर सर्वप्रथम माणसाच्या सुरक्षेलाच प्राधान्य द्यायला हवे आणि अवनीला जिवंत पकडण्याचा प्रयत्नही झालाच पाहिजे, परंतु याच्याही पुढे जाऊन अशा आणखी अवनी निर्माण होऊ नयेत यासाठी काय करता येईल हा विचार होणं गरजेचं आहे. चोरट्या शिकारींना आळा घालणे, लोकांचे जंगलावरील अवलंबित्व कमी करणे, वाघांचे नैसर्गिक अधिवास राखून ठेवणे, आणि त्यांच्यासाठी संरक्षित व पोषक वातावरण निर्माण करणे अशा ठोस प्रयत्नांची आवश्यकता आहे. विकासाचा दृष्टिकोन असणे ही चांगलीच गोष्ट आहे, पण निसर्गाला धक्का ना लावता केलेला विकास हाच शाश्वत विकास आहे. वाघ हा प्राणी नष्ट झाला तर सर्व पर्यावरणाचा तोलच ढासळेल.

वाघ नरभक्षक झाले तर त्यांना ठार मारण्यावाचून पर्याय उरणार नाही, आणि या दुष्टचक्रातून आपली कधीच सुटका होणार नाही. म्हणूनच वनविभागाच्या लोकांना अनेकांच्या रोषाला समोर जावं लागतं, प्रत्यक्ष काम करताना किती आणि कोणत्या अडचणींना तोंड द्यावं लागतं हे लक्षात घेऊन प्राणीप्रेमींनीही समजूतदार भूमिका घायला हवी. एकमेकांवर दोषारोप करत बसण्यापेक्षा एकत्रित प्रयत्न करून विकासाची व्यापक भूमिका घेऊन योजना आखल्या तर आपण फक्त वाघच नाही, तर त्यांचे अधिवासही वाचवू शकू व अशा अनेक 'अवनी' निर्माण होण्यापासून रोखू शकू, हे नक्की !

सामाजिक भानाचे दहन?

धार्मिक सोहळ्यात समाज म्हणून वावरताना सामाजिक भान राखणे गरजेचे आहे, नाहीतर अमृतसरसारखी दुर्घटना पुन्हा घडली तरी आश्चर्य वाटणार नाही.

पंजाबात शुक्रवारी 'रावणदहन' पाहण्यास जमलेल्या लोकांमधल्या ६२ जणांचा रेल्वे गाडीखाली आल्याने मृत्यू झाला. विजयादशमीनिमित्त रावण दहनाचा कार्यक्रम सुरू होता. दहन सुरू होताच रावणाच्या पुतळ्यातील फटाके वाजू लागले आणि ते दृश्य मोबाईलमध्ये कैद करण्यात गुंग असलेल्या लोहमार्गावरच्या जमावाला आपल्या रोखाने रेल्वे येतीये हे कळलेच नाही. फटाक्यांच्या आवाजामुळे रेल्वेगाडीचे प्रखर दिवे आणि भोंगे कुणाला ऐकू गेले नाहीत आणि क्षणार्धात लोहमार्गावर उभ्या असलेल्या लोकांना चिरडून गाडी पुढे गेली. एकूणतः ही घटना अंगावर शहारे आणणारी आहे. या घटनेत दोष नक्की कोणाचा, यावर बऱ्याच चर्चा दररोज होत आहेत. पंजाबचे मुख्यमंत्री अमरिंदर सिंग यांनी या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. कालांतराने चौकशी अहवाल सादर झाल्यावर निष्कर्षही बाहेर येतील पण गेलेल्या ६२ जणांचा जीव परत येईल की नाही याची खात्री कोणीही देऊ शकणार नाही! (?)

या घटनेकडे पाहिलं तर पहिला मुद्दा येतो तो लोकांच्या हलगर्जीपणाचा. आपल्या जिवाची पर्वा न करता लोहमार्गावर बिनधास्त उभे राहून ते 'रावण दहन' पाहात होते. रेल्वे रूळ ओलांडून जाणे, हा गुन्हा आहे हे माहीत असूनदेखील बिनदिक्कत ते तिथे थांबले होते. अशावेळी काहीही कल्पना नसताना अचानक रेल्वेगाडीने येऊन चिरडले हे दुर्दैवी आहे. एखादया नियमाचे उल्लंघन करून आपल्या कृत्याचे समर्थन करणे आपल्या जिवावर बेतू शकते याचा प्रत्यय या घटनेतून आला. शेकडो लोक रूळांवर उभे असल्याचे रेल्वेचालकाला जरी दिसले तरी ब्रेक लावून रेल्वे थांबवेपर्यंत दुर्घटना घडून गेलेली होती.

दुसरा मुद्दा उपस्थित होतो तो की रेल्वे रूळांच्या जवळ कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी कोणी दिली पण दुर्दैवाने हा मुद्दा निरर्थक ठरतो कारण हा कार्यक्रम विनापरवाना आयोजित करण्यात आला होता. झालेल्या दुर्घटनेनंतर कार्यक्रमाचे आयोजक फरारी झाले आहेत. त्यामुळे गेलेले जीव नक्की कशाचे बळी आहेत हा प्रश्न गेलेल्यांच्या नातलगांना त्याचबरोबर देशातील सर्वांना पडलेला आहे. धार्मिक कार्यक्रमात असा अनुचित प्रकार घडू नये याची काळजी आयोजकांबरोबरच प्रशासनाने घ्यायला हवी होती. पण त्याचवेळी लोकांनीही जबाबदारीने वागायला हवे होते.

या साऱ्या घटनेनंतर आपण काही शिकणार आहोत की नाही हा प्रमुख प्रश्न उपस्थित होतो. एवढा मोठा अपघात झाल्यानंतरही लोक मोबाईल काढून त्याचे शूटिंग करत होते ही निष्काळजी वृत्ती कधी थांबेल याचा शोध घेण्याची गरज आहे. धार्मिक तसेच सामाजिक सोहळ्यात एक समाज म्हणून सामाजिक नियमांचे पालन केले पाहिजे हे सर्वांनी लक्षात घ्यायला हवे. अपघात घडून गेल्यावर त्याचे खापर प्रशासनावर फोडण्यापूर्वी आपल्याकडून कोणत्या सामाजिक नियमांचे उल्लंघन झालंय का असा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा. प्रशासनानेदेखील कोणत्याही कार्यक्रमाला परवानगी देण्यापूर्वी लोकांच्या सुरक्षिततेसाठी आयोजकांनी काय प्रयत्न केले आहेत हे पाहायला हवे. निदान भविष्यात तरी अशा दुर्घटना घडू नयेत, याची काळजी प्रत्येकाने घ्यायला हवी. समाज म्हणून वावरताना सामाजिक भान आणि नियमांचे पालन करणे अत्यंत गरजेचे आहे.

दिनविशेष

जागतिक पोलिओ दिवस विशेष

प्रणित जाधव

'दो बूँद ज़िन्दगी के' ही अमिताभ बच्चन यांनी केलेली जाहिरात सर्वांना माहीतच असेल. तुम्ही म्हणत असाल 'आता याचं काय अचानक,' तर याला कारण आहे आज असणारा जागतिक पोलिओ दिवस. याच निमित्ताने पोलिओ निर्मूलनासाठी झालेल्या विविध स्तरांवरील उपाययोजनांचा घेतलेला हा आढावा. पोलिओमाइलाइटिस (पोलिओ) या सर्वाधिक संसर्गजन्य रोगावर लस तयार केलेल्या 'जोनास साल्क' यांच्या जन्मदिनी रोटरी इंटरनॅशनल या संस्थेने एक दशकापूर्वी जागतिक पोलिओ दिवस साजरा करण्यास सुरुवात केली.

भारतात पोलिओ लसीकरणाची सुरुवात १९७८ मध्येच झाली पण १९८८ सालच्या 'जागतिक पोलिओ निर्मूलन' उपक्रमानंतर भारताने १९९५ पासून 'पल्स पोलिओ' योजनेला सुरुवात केली. पोलिओच्या विषाणूंचा सर्वाधिक प्रभाव ५ वर्षांखालील बालकांवर जास्त पडत असल्याने घरोघरी जाऊन लसीकरण करण्याचा उपक्रम सरकारने हाती घेतला व तो तितकाच यशस्वीही झाला. १९८८ मध्ये या रोगाची लागण झालेल्यांची संख्या ३.५ लाख होती, ती २०१६ मध्ये ३७ झाली व या रोगाचे प्रमाण ९९.९ टक्क्यांनी कमी झाले.

२७ मार्च २०१४ रोजी भारताला डब्ल्यूएचओद्वारे दिले जाणारे 'पोलिओ मुक्त' राष्ट्राचे प्रमाणपत्र मिळाले. आता फक्त अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि नायजेरिया या देशांत 'जंगली पोलिओ व्हायरसचा' फैलाव दिसून येत आहे.

महाराष्ट्र दुष्काळाच्या फेऱ्यात

राज्यात १८० तालुक्यांत नुकताच दुष्काळ जाहीर झाला आहे. याच धर्तीवर राज्यातील जिल्ह्यांचा विभागनिहाय पद्धतीने घेतलेला हा आढावा.

अंकुश फोपसे

यंदा पावसाने दमदार हजेरी लावली पण नंतर मात्र त्याने बळीराजाची पाठ फिरवली. यावर्षी पावसाने वार्षिक सरासरीही ओलांडली नसल्याने त्याचा फटका खरीप पिकांना बसला. आता रब्बीचे पीक कसे घेणार? हा मोठा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. केवळ विदर्भच नव्हे तर मराठवाडा, खान्देशासह पश्चिम महाराष्ट्रातीलही काही भागात दुष्काळाची झळ जाणवत आहे. अजून उन्हाळा सुरू व्हायचा आहे. त्याआधीच महाराष्ट्राच्या अनेक भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. परतीचा पाऊस पडला तरी बहुतांश जिल्ह्यामध्ये उत्पन्न घटले आहे.

मराठवाड्याच्या विचार करता खरीपाचे सरासरी पेरणी क्षेत्र ५० लाख ४ हजार हेक्टर एवढे आहे. सप्टेंबर अखेर मराठवाड्यात सर्वात कमी म्हणजे सरासरीच्या १३.१ टक्केच पाऊस पडला. अपुऱ्या पावसाने खरिपाच्या उत्पन्नात घट झालीच परंतु रब्बीचा मोठा प्रश्न मराठवाड्यातील शेतकऱ्यांसमोर आहे. यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. परिणामी ग्रामीण भागाचे अर्थचक्रच कोलमडले. २०१० पासून एक-दोन वर्षे वगळता मराठवाड्यातील पाऊसमान कमीच होत आहे. यावर्षी सुरुवातीला मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद या जिल्ह्यात चांगला पाऊस झाला होता. त्यानंतर मात्र पावसाने ओढ दिल्याने पिके हातची गेली. मराठवाड्यात आज घडीला १४२ गावांमध्ये १५५ टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो आहे. त्यामुळे उन्हाळ्यात तर ही परिस्थिती आणखी विदारक होईल अशी चिन्हे आहेत.

विदर्भाची अवस्था यापेक्षा वाईट आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अपुऱ्या व अनियमित पावसाने विदर्भातील शेतीचे मोठे नुकसान केले आहे. विदर्भात कापूस, धान आणि सोयाबीन ही मुख्य पिके घेतली जातात. यंदा या तिन्ही पिकांना अत्यल्प पावसाचा फटका बसला आहे. खरिपाचे उत्पन्न निम्मेही झाले नाही. रब्बीच्या पेरणीची शक्यताही नाही. चार वर्षांपासून सातत्याने दुष्काळी परिस्थितीशी तोंड देणाऱ्या शेतकऱ्यांचे दोन्ही हंगाम बुडाले आहेत. गावात रोजगार नसल्याने अनेकांनी शहराची वाट धरली. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या आत्महत्याही वाढल्या आहेत. पाऊस नसल्याने रब्बीची पेरणीही झाली नाही. पश्चिम विदर्भात सप्टेंबर महिन्यापर्यंत केवळ ३६ टक्केच पाऊस झाला. संपूर्ण एक महिना कोरडा गेला. त्यामुळे सोयाबीनचे पीक हातून गेले.

उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यातही गंभीर परिस्थिती आहे. नाशिकमध्ये ६१.४०%, धुळ्यात ७४.९०%, नंदुरबारमध्ये ६०% आणि जळगाव मध्ये ६५% अशी पर्जन्यमानाची टक्केवारी जरी असली तरी यात पावसाचे सातत्य

प्रातिनिधिक छायाचित्र

नसल्याने पिकांवर फार मोठा परिणाम झाला आहे. उत्तर महाराष्ट्रातील चारही जिल्ह्यात ज्वारी, बाजरी, मका, तूर, सोयाबीन, कापूस यासारखी पिके घेतली जातात. या सर्व पिकांना पावसाने मारलेल्या दांडीमुळे फटका बसला आहे. रब्बी हंगामाची शाश्वती नाही. पुढच्या हंगामापर्यंत जगायचं कसं हा प्रश्न शेतकऱ्यासमोर आहे.

पश्चिम महाराष्ट्रातही पर्जन्याच्या असमान वितरणामुळे काही जिल्ह्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर या पाच जिल्ह्यांचा महसूली विभाग आहे. यावर्षी वरुणराजाची अवकृपा झाल्याने शेतकऱ्यावर दुष्काळाचे संकट आले आहे. पाण्याचा साठा कमी असल्याने पीक जगवायचे कसे आणि स्वतः जगायचे कसे हा जगण्या-मरण्याचा प्रश्न आज शेतकऱ्यांसमोर आहे. ऊसाची शेती ही प्रामुख्याने या भागातील शेती आहे. या भागात ३५ मोठी धरणे आहेत. आतापर्यंत पाण्याच्या बाबतीत हा भाग सुखी राहिला आहे. मात्र यावर्षी पावसाने पाठ फिरवल्याने सगळ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

पाणीटंचाई, दुष्काळ हा राज्याची पाठ सोडायला काही तयार नाही. त्यावर नेहमीप्रमाणे राजकारण न करता ठोस पावले उचलण्याची गरज आहे. ऐन सण-उत्सवाच्या काळात आलेल्या दुष्काळाच्या सावटामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. तूर्त सरकारी पातळीवर आकडेमोड चालू झाली असून अनेक तालुक्यात दुष्काळ जाहीर होईल अशी स्थिती आहे. नुसता दुष्काळ जाहीर करून प्रश्न सुटणार नाहीत. योजना कागदावर राबवून चालणार नाही. 'जलयुक्त शिवारा'चे पाणी नेमके कुठे मुरले याचाही तपास होणे गरजेचे आहे. भविष्यकालीन परिस्थितीचा आढावा घेऊन दुष्काळावर कशी मात करता येईल यासाठी कायमच्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.

विचारता 'सवाल', व्हावे लागले 'हलाल'

सौदी अरेबियातील राज्यकर्ते त्यांच्या बदलत्या वैचारिक आणि सामाजिक धोरणांचा गाजावाजा करून एक उदारमतवादी राष्ट्र असल्याचे भासवत आहे खरे पण जमाल खशोगी या पत्रकाराच्या हत्येचा मागोवा घेता त्यांचा मुखवट्याआडचा खरा चेहरा समोर आला आहे.

प्रणित जाधव

जमाल खशोगी हे बंडखोर पत्रकार सौदी अरेबियाच्या तुर्कस्तानातील दूतावासातून अचानक गायब झाले असून, महंमद बिन सलमान यांच्या आदेशाने त्यांची क्रूर रीतीने हत्या घडविण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे एकीकडे वैचारिक क्रांती, सामाजिक सुधारणावादी असा समज निर्माण करायचा आणि दुसरीकडे आपल्याविरुद्ध जाणाऱ्याला भूतलावरूनच 'गायब' (मारून टाकायचे) करायचे असा उपक्रम चालविणाऱ्या महंमद बिन सलमान यांचा पुढील कारभार किती भयावह असेल याची प्रचिती येण्यास सुरुवात झाली आहे. सर्व प्रकारच्या युद्धांत काही ना काही चुका होतातच. येमेनमधील हौती बंडखोरांच्या विरोधातील लष्करी संघर्षात निरपराध माणसे बळी जात होती, तेव्हा मानवी हक्कांविषयी चिंता करणाऱ्यांच्या तोंडावर सौदी अरेबियाचे राजपुत्र महंमद बिन सलमान यांनी हे वाक्य फेकले होते. मानवी हक्क वगैरे तत्त्वांविषयी त्यांच्या मनाची काय धारणा आहे, याची साधारण कल्पना त्यावरून यायला हरकत नाही. त्यामुळे केलेले कोणतेही दुष्कृत्य या सबबीखाली खपविले जाईल, असा काही त्यांचा समज आहे. हे सारे पाहता स्त्रियांना स्वातंत्र्य देणे, उदारमतवादी धोरणाचे प्रदर्शन या गोष्टी सत्तेत राहण्यासाठीचे डावपेचच आहेत असं लक्षात येत आहे. सौदी अरेबियाचे संरक्षणमंत्रिपद २०१५मध्ये हाती घेतल्यापासून बिन सलमान यांची राजकीय महत्त्वाकांक्षा वाढीला लागली आहे. पश्चिम आशियावरील नेतृत्त्वाच्या स्वप्नाने पछाडलेले बिन सलमान आपले सामर्थ्य वाट्टेल त्या मार्गाने प्रस्थापित करू पाहत आहेत. मागील तीन वर्षांतील घटनाक्रम पाहता आपल्याला त्यांची राजकीय भूक लक्षात येईलच. परकी गुंतवणूक आणि जागतिक विश्वासार्हतेच्या वाढीसाठी परंपरानिष्ठ समाजाला नवा आणि आधुनिक विचार देण्याचा आव ते आणत आहेत. पण हे करत असतानाच दुसरीकडे आपल्या विरोधकांना थेट संपवण्याचा एककलमी कार्यक्रम बिन सलमान यांनी हाती घेतला आहे. जमाल खशोगी हे त्यातील ताजे उदाहरण. तुर्कस्तानातील वाणिज्य दूतावसात खशोगींना पाचारण करून त्यांना अत्यंत क्रूरपणे ठार मारल्याचे समोर येत आहे. या सर्व घटनेचा तपशील पाहता आपल्या मार्गात येणाऱ्याला बाजूला सारताना बिन सलमान यांची मजल कुठपर्यंत जाऊ शकते हे स्पष्टपणे दिसते.

सौदी अरेबियाच्या अभ्यासकांच्या यादीमध्ये पत्रकार जमाल खशोगी हे एक अग्रणी नाव. नेमके निरीक्षण आणि अचूक भाकीत करण्यात हातखंडा, तथ्यपूर्ण आणि तपशीलवार लेखन अशी खशोगी यांची ओळख. पत्रकार खशोगी यांच्या चिकित्सक लिखाणामुळे त्यांना सौदीतून बाहेर पडावे लागले. मग अमेरिकेत जाऊन त्यांनी पत्रकारिता सुरू ठेवली.

जमाल खशोगी

'वॉशिंग्टन पोस्ट'मधील लिखाणातून त्यांनी सौदी राज्यकर्त्यांच्या धोरणांवर टीकेची धार धरली होती आणि बिन सलमान यांच्या प्रतिमेचे टवके उडायला सुरवात झाली होती. त्याचीच प्रतिक्रिया म्हणजे ही हत्या, असा दाट संशय आहे; पण हे प्रकरण नुसते एक राजसत्ता आणि त्याविरोधातील बंडखोरी एवढ्यापुरते मर्यादित नसून, त्याचे दूरगामी जागतिक परिणाम आहेत. 'खशोगी यांची सौदीने हत्या घडवून आणल्याचे सिद्ध झाले तर योग्य ती कारवाई करू', असा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिल्यानंतर आर्थिक आघाडीवर नवे संकट येते की काय, या शंकेने अनेकांची झोप उडाली असेल. मानवी हक्क आणि स्वातंत्र्याचा उच्चार अमेरिकी राज्यकर्ते नित्यनेमाने करीत असतात; पण त्यातील निवडकपणा जगाच्या नजरेतून सुटलेला नाही. एकूणच आंतरराष्ट्रीय राजकारणात तत्त्वे आणि मूल्ये यांची कशी वासलात लावली जात आहे, याचे प्रत्यंतर अलीकडे वारंवार येत आहे. विरोधातील व्यक्तीचा काटा काढण्यासाठी कोणताही मार्ग निषिद्ध नाही, हे चीन आणि रशियाच्या अध्यक्षांनी दाखवून दिलेच होते. ट्रम्प यांनीही उघडपणे महासत्तेच्या अंगावरील एकेक जबाबदारी झटकून टाकण्याचा सपाटा लावला आहे. त्यांच्या बाबतीत विचारसरणीचा प्रश्न येत नाही. त्यामुळे आपल्या देशातील एका पत्रकाराला आपल्याच मित्रदेशाने तिसऱ्या देशात षडयंत्र करून मारल्याचा विषय ते किती लावून धरतील, हा प्रश्नच आहे.

अशा वातावरणात पश्चिम आशियातील सौदी अरेबियाकडून वेगळी अपेक्षा ती काय ठेवणार? असो पण आंतरराष्ट्रीय घडामोडींचा विचार करता त्यांच्या या कौशल्यावरच त्यांच्या पुढील राजकारणाचा आणि कार्यशैलीचा रोख स्पष्ट होईल हे नक्की.

मुद्रक आणि प्रकाशक : डॉ. उज्ज्वला बर्वे (विभागप्रमुख, संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ). मार्गदर्शक : प्रा. संजय तांबट, प्रा. योगेश बोराटे, प्रा. संदीप नरडेले.
संपादक : मयुर वाघ, उपसंपादक : तेजसी आगाशे, प्रणित जाधव. बातमीदार : अंकुश फोपसे, चेतन झडपे.